PM-USHA या केंद्रपुरस्कृत योजनेंतर्गत MMER (Management, Monitoring Evaluation and Research) (१०० टक्के केंद्रपुरस्कृत) या घटकाच्या सर्वसाधारण उपघटकासाठीचा केंद्र हिस्सा राज्य प्रकल्प संचालनालय, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान यांना उपलब्ध करुन देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२६/ई-१६३८८९४/विशि-३**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२.
दिनांक: २० मे, २०२६.

पहा:-

१. भारत सरकार, वित्त मंत्रालय, व्यय विभाग शासन निर्णय क्र.F.No.१ (२७)/ PFMS/ २०२० दि.१३.०७.२०२३
२. भारत सरकार, शिक्षा मंत्रालय, उच्च शिक्षण विभाग यांचे पत्र क्र. F.No. २४-२७/ २०२६-U.Policy, दि. ३१ मार्च, २०२६
३. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. ०७.०५.२०२६
४. राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. राप्रसं/ रुसा/ २०२५-२६/०१, दिनांक ०१ एप्रिल, २०२६

प्रस्तावना :

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान या केंद्रपुरस्कृत योजनेसाठी केंद्राकडून सर्वसाधारण घटक, अनुसूचित जाती उपयोजना आणि अनुसूचित जनजाती उपयोजना अंतर्गत निधी उपलब्ध होतो. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान या योजनेच्या MMER (Management, Monitoring Evaluation and Research) (१०० टक्के केंद्रपुरस्कृत) या घटकासाठी केंद्र शासनाने संदर्भ क्र. २ येथील पत्रान्वये सर्वसाधारण उपघटकासाठी रू. ३६,५०,०००/- इतकी Mother Sanction वितरीत केली आहे.

त्यानुसार, सर्वसाधारण घटक योजनेसाठीचा केंद्र हिस्सा रू. ३६,५०,०००/- इतकी तरतूद राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, मुंबई यांना अर्थसंकल्पिय अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (BEAMS) वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

केंद्र शासनाच्या संदर्भाधीन दिनांक ३१ मार्च, २०२६ च्या पत्रान्वये प्राप्त PM-USHA या केंद्र पुरस्कृत योजनेच्या सर्वसाधारण घटक योजनेसाठीच्या केंद्र हिस्साचे अनुदान रू. ३६,५०,०००/- (रूपये. छत्तीस लक्ष पन्नास हजार फक्त) राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, मुंबई यांना

अर्थसंकल्पिय अंदाज वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (BEAMS) वितरित करण्यास राज्य शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. उपरोक्त रू. ३६,५०,०००/- (रूपये. छत्तीस लक्ष पन्नास हजार फक्त) निधी मागणी क्र. डब्ल्यू २, २२०२, ०३- विद्यापीठीय व उच्च शिक्षण, १०३, शासकीय महाविद्यालये व संस्था, (०७) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, (०७) (०३) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान- व्यवस्थापन, संनियंत्रण, मूल्यांकन आणि संशोधन (केंद्र हिस्सा १०० टक्के) (कार्यक्रम) (२२०२ एल ३२४), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात मंजूर तरतूदीतून वितरीत करण्यात येत आहे.

३. वरील अनुदानाची सर्व कागदपत्रे व हिशोब महालेखापाल, महाराष्ट्र -१ किंवा प्रकरणपरत्वे महालेखापाल-२, नागपूर यांनी सदर कामाकरीता प्राधिकृत केलेले अधिकारी यांना तपासण्याचे अधिकार असून त्यांनी मागणी केल्यास, सर्व कागदपत्रे त्यांचेकडे तपासणी करीता राज्य प्रकल्प संचालक (रुसा) यांनी सादर करावीत.

४. राज्य प्रकल्प संचालक (रुसा) यांना केंद्र शासनाने ज्या प्रयोजनार्थ निधी मंजूर केला आहे त्या निधीचा वापर त्या प्रयोजनासाठीच करावा. खरेदी व बांधकामाची मान्यता विद्यापीठ लेखासंहितेनुसार सक्षम प्राधिका-यामार्फत घेण्यात यावी.

५. तसेच, उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.०१.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदी व त्यासोबतच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे तसेच तद्नंतर वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांनुसार सदरची खरेदीप्रक्रीया विद्यापीठांनी त्यांच्या स्तरावर पार पाडावी व विहित कालावधीमध्ये सदरचा खर्च पुर्णपणे करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. ०७.०५.२०२६ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०५२०१३१४४६३३०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATAP
PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=b0d6763338fc6cc4f7cf07ca60db7abc1cfac99c84ab1b5bfc0dae4609d631d0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF6895C47A84066432F5BDD1F182B4163D880AC9BD8D24A198FD0E7310BBEB59, cn=PRATAP PANDURANG LUBAL
Date: 2026.05.20 13:16:08 +05'30'

**(प्रताप पां. लुबाळ)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति :

१. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

२. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) संचालनालय, मुंबई.
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / लेखापरीक्षा, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
६. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. वित्त विभाग,(व्यय-५), (अर्थसंकल्प-३/८), मंत्रालय, मुंबई.
९. अवर सचिव (अर्थसंकल्प कक्ष), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.निवड नस्ती (विशि -३), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.